# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार विविध उपाययोजनांची अंमलबजावणी**

मा. उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी महापालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी तातडीने विभागप्रमुखांची आढावा बैठक घेत आवश्यक ते निर्देश दिले आहेत. सदर बैठकीस अति. आयुक्त अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त संभाजी पानपट्टे, सर्व उपायुक्त, शहर अभियंता व विभागप्रमुख उपस्थित होते.

हवेची गुणवत्ता वाढवण्यासाठी सर्व प्रभाग अधिकारी यांनी आरएमसी प्लांटला भेट देऊन स्थळ पाहणी करून नियमांचे उल्लंघन न होण्याबाबत प्लांट धारकांना लेखी आदेश देण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी व RMC प्लांट धारकांनी मिस्ट स्प्रे यंत्रणा बसविणे, साईट वरून बाहेर येणाऱ्या गाड्यांचे टायर धुणारी यंत्रणा बसविणे, ग्रीन नेटचा वापर करणे व डेब्रिज वाहून नेणाऱ्या गाड्या या बंदिस्त राहतील याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत दैनंदिन साफसफाई करताना धुळीवर नियंत्रण आणण्यासाठी मेकॅनिकल स्विपिंग मशीनचा वापर करणे, उघड्यावर कचरा जळणाऱ्यांवर कारवाई करणे, डंपिंग ग्राऊंडवर कचऱ्यावर प्रक्रिया ~~करताना~~ हवा प्रदूषण होणार नाही याबाबत दक्षता घेणे, बंदिस्त कचऱ्यातून कचऱ्याची वाहतूक करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सर्व शिक्षण संस्थेत हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षण विभागाने जनजागृती करणे व विद्यार्थ्यांमध्ये घातक फटाके वापराबाबत दुष्परिणाम समजावून सांगून जनजागृती मोहीम राबविण्याच्या सूचना मा. आयुक्त यांनी दिल्या आहेत. सदर आदेशांची तातडीने अंमलबजावणी करून त्याचा अहवाल सबंधित विभागीय अधिकाऱ्यांनी उपायुक्त (पर्यावरण) यांच्याकडे सादर करण्याचे निर्देश मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी दिले आहे.